महाराष्ट्र टाइम्स

Thursday, May 21, 2009

**For 'Smokefree' Mumbai...!**

Publication: Maharashtra Times, Edition: Mumbai, Journalist: Bureau, Page No: 3, Location: Top-Left, Width(cms): 22, Height(cms): 6, Size(sq.cms): 132

# 'स्मोक फ्री' मुंबईसाठी...!

## धूम्रपान रोखण्यासाठी पालिकेची भरारी पथके

>> म. टा. खास प्रतिनिधी

सार्वजनिक ठिकाणी 'नो स्मोकिंग'चा घोष लावूनही प्रत्यक्षात फारच कमी रेस्टॉरंट्स व पब्ज या नियमाची अमलबजावणी करत असल्याची माहिती पुढे आली आहे. 'स्मोक फ्री' मुंबईसाठी आता पालिकेकडून लवकरच भरारी पथके नेमण्यात येणार आहेत.

सार्वजनिक ठिकाणी 'नो स्मोकिंग' हा कायदा कितपत यशस्वी ठरला याची पाहणी महापालिका, टाटा मेमोरिअल सेंटर, हेलिस सेखसरिया इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थ आणि सलाम बॉम्बे फाऊंडेशन या संस्थांनी केली. त्यात शहरातील जवळपास ६४ टक्के रेस्टॉरंटस आणि पब्ज या नियमाची अमलबजावणी करत असल्याचे आढळल्याची माहिती वरील सर्व संस्थांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. 'इन्डोअर' असलेल्या सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानामुळे 'एअर क्वालिटी' डम्पिंग ग्राऊंडहूनही वाईट होत असल्याचे पाहणीत आढळून आले. तर हुक्का रेस्टॉरंटस तसेच बारमध्ये 'एअर क्वालिटी' अतिशय वाईट होती. 'यूएस पर्यावरण संरक्षण एजन्सी'च्या 'एअर क्वालिटी' मार्गदर्शक तत्त्वांनुसार आरोग्याकरिता हानिकारक २.५ पीएमपेक्षाही हा स्तर खूप अधिक आहे, असे 'हेलिस'चे डॉ. पी. सी. गुप्ता म्हणाले.



टाटा मेमोरिअल सेंटरकडून यासंदर्भात पालिकेचे अमलबजावणी अधिकारी, वैद्यकीय अधिकारी आणि रेस्टॉरंट मालकांना धूम्रपानाच्या घातक परिणामांची तसेच संबंधित कायद्याची माहिती दिली जात आहे, असे 'टाटा'चे प्रिव्हेंटिव्ह ऑन्कॉलॉजी विभागप्रमुख डॉ. सुरेंद्र शास्त्री म्हणाले. हॉटेल आणि रेस्टॉरंटस मालकांची संघटना 'आहार'चे नारायण अल्वा यांनी रेस्टॉरंट मालकांची कैफियत मांडली. धंद्याच्या रकमेतील फरक, सिगरेट ओढण्यासाठी बाहेर जातो असे सांगून बिल न भरताच पळ काढणारे गिऱ्हाईक, कायद्याला न जुमानणारे गिऱ्हाईक आदी अडचणी त्यांनी सांगितल्या.

### पावणेसहा लाखांचा दंड

धूम्रपानबंदी अंमलात आल्यापासून 'एफडीए'ने राज्यभरात सुमारे ५ लाख ७५ हजार रु. दंडापोटी गोळा केले आहेत. तर मुंबईत पालिकेने ३८ हजार रुपयांचा दंड जमा केला आहे.